OK

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन तक्रार/२०२३ दिनांक: /११/२०२३

प्रति,

मा.सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियत्रंण समिती,
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 301
दिनांक 13/12/2023
mangrove cell
प्रशासकीय अधिकारी
उप वनसंरक्षक

**विषय:- बागमळा, ता. अलिबाग येथे खाडया बुजविणे व खाडी किनारीची mangrove नष्ट करणे, पाणथळ जागांवर भराव Intertidal zone मध्ये भराव करणे. (तक्रार क्र.१८८)**

संदर्भ:- आपलेकडील पत्र जा.क्र.ल.ले./समिती/४६/सन २०२२-२३ दिनांक १०/०६/२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री. मंगेश आठवले यांनी आपल्या कार्यालयाकडे ईमेलव्दारे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने तहसिलदार अलिबाग यांनी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांजकडे सादर केलेल्या अहवालान्वये उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी त्यांचेकडील दि. ०८/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर केलेला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. मंगेश आठवले यांचा दिनांक २०-०५-२०२२ रोजीचा ईमेलव्दारे तक्रार अर्ज |
| २. | तक्रारीचा विषय | बागमळा, ता. अलिबाग येथे खाडया बुजविणे व खाडी किनारीची mangrove नष्ट करणे, पाणथळ जागांवर भराव Intertidal zone मध्ये भराव करणे |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | मौजे बागमळा, ता.अलिबाग |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) तहसिलदार अलिबाग<br>२) परिक्षेत्र वन अधिकारी, (कांदळवन कक्ष) अलिबाग<br>३) उप अधिक्षक, भूमी अभिलेख अलिबाग<br>४) गट विकास अधिकारी, अलिबाग<br>५) वरीष्ठ पोलिस निरीक्षक, अलिबाग पो.टाणे<br>६) मंडळ अधिकारी, नागाव |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | मौजे बागमळा, नागाव ता. अलिबाग येथील गट नंबर १८/१, १८/२, १८/३, ३१, ३२, ३५, २४९, १२२, १२३, ११०, २६३, १९७, २५१, २६, २७, २४०, २९, ३०, ३३, ३४, १३, १४, १५, १६ व ३६ हया मिळकती डायनामिक्स व्हेकेशन रिसॉर्ट प्रा.लि. यांचे नांवे दाखल आहेत.<br>तक्रारदार यांच्या अर्जात उल्लेखित खाडीची पाहणी केली असता, सदर ठिकाणी स्थानिक भाषेत नाला असे संबोधतात. सदरचा नाला पूर्वेकडून |

| | | |
|---|---|---|
| | | पश्चिमेकडे वाहत जाऊन दक्षिणेस खाडीस जाऊन मिळत आहे. सदर नाल्याची पूर्ण पाहणी केली असता, त्याचे पाणी कोठेही अडल्याचे दिसून येत नाही. सदर नाल्याच्या दोन्ही काटास गवत उगवलेले दिसून येत असून, त्याच्या काठी किंवा बाजुस कोठेही भराव केल्याचे दिसून येत नाही. सदर ठिकाणी पूर्वी शेती करत असून आजमितीस त्या ठिकाणी ओसाड जागेवर गवत वाढलेले दिसून येत आहे. सदर भागात कोठेही मॅग्रोजची तोड झाल्याचे दिसून येत नाही. तसेच उर्वरीत गट नंबरच्या मिळकतीची पहाणी केली असता, सर्वावर फक्त गवत दिसून येत असून, सदर मिळकतीत अंतर्गत रस्त्याकरीता भराव केल्याचे दिसून येत आहे. परंतु सदर रस्त्यावर गवत उगवलेले असल्यामुळे सदरचा भराव हा पूर्वीचा असल्याचे दिसून येते. तसेच सदर भागात कुठेही पाणी तुंबून असल्याचे अगर गावातून वाहत येणारे पाणी या भागात साटून राहिल्याचे दिसून येत नाही. सदर बाबत कंपनीच्या प्रतिनिधींना विचारले असता, त्यांनी सदर रहिवाशी प्रकल्पासाठी कंपनीने शासनाच्या सर्व नियमांच्या आवश्यक त्या परवानग्या घेतलेल्या असून, सदर प्रकल्प शासनाने मंजूर केला असल्याचे तहसिलदार अलिबाग यांनी या कार्यालयास कळविले आहे.<br>तसेच मौजे बागमळा येथील सदर क्षेत्राबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, अलिबाग यांनी गुगल हिस्टोरीकचे उपलब्ध असलेल्या इमेजेसचे अवलोकन केले असता, सदर इमेजेस हया २०११ पासून उपलब्ध आहेत. त्याचे विश्लेषण करावयाचे झाल्यास सदर तक्रारीत अल्लेखीत भागात मॅग्रोव्हजचे अस्तित्व दिसून येत नाहीत. तसेच भागाचे जिपीएस रिडींग N १८.५९१६० E ७२.९११७ असे आहे. तरी तक्रारदार यांनी केलेल्या तक्रार अर्जातील वस्तुस्थिती ही खरी नसल्याने त्यांचा तक्रार अर्ज निकाली काढणेस व नस्तीबध्द करणेस विनंती आहे असे या कार्यालयास कळविले आहे. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | तक्रार अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | कांदळवनाचा ऱ्हास/तोड झाली नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला नाही. |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | कांदळवनाचा ऱ्हास/तोड झाली नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला नाही. |
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | वरील प्रमाणे प्राप्त अहवालानुसार तक्रार अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. |

उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

9820088176

(डॉ. योगेश म्हसे)
**जिल्हाधिकारी रायगड**